ICE 'n' SPICE
व्हेज रेस्टॉरन्ट
पंजाबी डिशेस् । पावभाजी । चाईनीज । ज्युसेस् । आईस्क्रीम
गोदावरी कॉम्प्लेक्स,व्ही.आय.पी.रोड,नांदेड
मो. 9422172572, 9850430189

सायं दैनिक

# नांदेड वार्ता

www.nandedwarta.com

• वर्ष २४ वे • अंक २३४ • सोमवार दि.१५ जून २०२६ • नांदेड • पोस्ट परवाना क्र.जी.-२/आरएनपी/एनएनडी-२६२/२०२३-२०२५ • पाने ४ • किंमत १ रु.

# प्रसिद्ध तोष्णीवाल मेडीकल स्टोअर्सवर एफडीएची कारवाई

## कालबाह्य गोळ्या विक्री करताना रंगेहाथ पकडले;ग्राहकाने थेट तुकाराम मुंडेंकडे केली होती तक्रार

नांदेड/प्रतिनिधी-शहरातील डॉक्टरलेन भागात असलेल्या नामवंत तोष्णीवाल मेडीकल स्टोअर्समधून ग्राहकांना कालबाह्य डायबिटीसच्या गोळ्या विक्री करीत असतांना अन्न औषध प्रशासन विभागाच्या अधिकाऱ्यांनी आज (सोमवार) रंगेहाथ पकडले आहे. ग्राहकाने थेट अन्न औषध प्रशासन विभागाचे आयुक्त तुकाराम मुंडे यांच्याकडे तक्रार केली होती. या कारवाईमुळे मेडीकल चालकांमध्ये खळबळ उडाली.


अन्न औषध विभागाचे आयुक्त म्हणून सनदी अधिकारी तुकाराम मुंडे यांनी राज्यभरात कारवाईचे सत्र सुरु केले आहे. त्यांच्या तत्परतेचा अनुभव नांदेडकरांना मिळाला आहे. नायगाव तालुक्यातील हनुमंत वन्नाळेकर यांनी शनिवार दि.१३ जून रोजी नांदेड शहरातील डॉक्टरलेन भागात असलेल्या तोष्णीवाल मेडीकल स्टोअर्समधून आपल्या ९० वर्षीय वडिलांसाठी डायबिटीसच्या गोळ्यांचे तीन स्ट्रीप्ट खरेदी केले. वन्नाळेकर हे गोळ्या घेवून सायंकाळी गावी परतले. त्यांच्या मुलीने सदरील गोळ्यांचे स्ट्रीप्ट वाचले असता सदरील गोळ्यांची मुद्दत सहा महिन्यांपूर्वीच म्हणजे (डीसेंबर २०२५ मध्ये) संपल्याचे निदर्शनास आले. ही बाब समजल्यानंतर वन्नाळेकर यांच्या मुलाने राज्याचे अन्न औषध व प्रशासन विभागाचे आयुक्त तुकाराम मुंडे यांच्याकडे तोष्णीवाल मेडीकलमधून डायबिटीज गोळयांची कालबाह्य विक्री होत असल्याची ई-मेलवर तक्रार केली. मुंडे यांनी या तक्रारीची गंभीर दखल घेवून नांदेड येथील अन्न औषध प्रशासन विभागाच्या अधिकाऱ्यांना कारवाई करण्याचे आदेश दिले. त्यानंतर आज (सोमवार) दि.१५ जून रोजी सकाळी तक्रारदार हनुमंत वन्नाळेकर यांनी तोष्णीवाल मेडीकल स्टोअर्स येथे जावून डायबिटीज गोळ्यांची खरेदी केली. सदरील गोळया मुद्दतबाह्य विक्री करीत असतांना अन्न औषध प्रशासन विभागाचे सहाय्यक आयुक्त अशोक राठोड व त्यांच्या सहकाऱ्यांनी रंगेहाथ पकडले. या घटनेनंतर नांदेड शहरातील मेडीकल स्टोअर्स चालकांमध्ये खळबळ उडाली. अन्न औषध प्रशासन विभागाच्या अधिकाऱ्यांनी दोन तास मेडीकल स्टोअर्सची तपासणी करुन कालबाह्य गोळ्या जप्त केल्या आहेत. प्रशासनाने तोष्णीवाल मेडीकल स्टोअर्स बंद ठेवण्याचे आदेश दुकानाच्या मालकाला दिले आहेत. तोष्णीवाल मेडीकल स्टोअर्स हे शहरातील नामवंत




होलसेल दुकान म्हणून ओळखले जाते. अशा नामवंत दुकानातून ग्राहकांना कालबाह्य गोळ्यांची विक्री होत असल्याचा प्रकार उघडकीस आला आहे.

# जून अर्धा संपला तरीही पावसाची दांडी

## मांडवी परिसरातील शेतकरी दुबार पेरणीच्या संकटात



मांडवी/प्रतिनिधी-जून महिना अर्धा संपत आला तरी मांडवी आणि परिसरात अद्यापही दमदार पावसाची सुरुवात झालेली नाही. दरवर्षी या काळात शेतात पेरण्यांची लगबग पाहायला मिळते, मात्र यंदा पावसाने दडी मारल्यामुळे बळीराजा चिंतातुर झाला आहे. त्यातच, हवामान विभागाने वर्तवलेला अल निनोचा अंदाज आणि कोरड्या पडलेल्या ढगांमुळे शेतकऱ्यांच्या तोंडचे पाणी पळाले आहे.

धूळ पेरणी उलटण्याची भीती, त्यामुळे शेतकरी हवालदिल झाला आहे. मांडवी परिसरातील अनेक शेतकऱ्यांनी मान्सूनच्या सुरुवातीच्या अंदाजावर विश्वास ठेवून आणि पहिल्या काही थेंबांच्या भरवशावर धाडस करून 'धूळपेरणी' केली होती. पाऊस वेळेवर पडेल आणि पिके अंकुरतील, अशी आशा त्यांना होती. मात्र, पेरणी होऊन अनेक दिवस उलटले तरीही दमदार पाऊस न झाल्याने ही धूळपेरणी वाया जाण्याची भीती निर्माण झाली आहे. बियाणे जमिनीतच सडून जाण्याच्या किंवा करपून जाण्याच्या मार्गावर असल्याने शेतकऱ्यांवर आता दुबार पेरणीचे संकट ओढवले आहे. यामुळे आधीच आर्थिक संकटात असलेला शेतकरी कमालीचा हवालदिल झाला आहे.हवामान विभागाने आधीच 'अल निनो'च्या प्रभावामुळे यंदा सरासरीपेक्षा कमी पाऊस पडेल असा इशारा दिला होता. तरीही जुगार म्हणून आम्ही धूळपेरणी केली. आता पाऊस लांबल्याने बियाणे आणि खतांचा खर्च वाया जाण्याची भीती आहे. पुन्हा पेरणी करायची म्हटल्यास दुप्पट खर्च कुठून आणायचा, ***पान ४ वर***

# अभिनेत्री संचिता उगलेची आत्महत्या

मुंबई/प्रतिनिधी-मनोरंजन विश्वातून एक धक्कादायक बातमी समोर आली आहे. लोकप्रिय मालिका कुमकुम भाग्य सारख्या सीरिअलमधून प्रेक्षकांच्या भेटीला आलेली अभिनेत्री संचिता उगले हिने वयाच्या ३० व्या वर्षी आत्महत्या केली आहे.



प्राथमिक माहितीनुसार, संचिता उगले मुंबईलगतच्या नालासोपारा परिसरात आपल्या कुटुंबासोबत राहत होती. घटना घडली तेव्हा ती घरी एकटी घरी होती आणि तिने साडीने गळफास घेऊन आत्महत्या केल्याचे सांगितले जात आहे. तर पोलिसांनी या प्रकरणाची नोंद घेतली असून मृत्यूच्या नेमक्या कारणांचा तपास सुरू आहे. घटनास्थळावरून कोणतीही चिठ्ठी किंवा अधिकृत संदेश आढळून आल्याची माहिती अद्याप समोर आलेली नाही. संचिता उगलेने अल्पावधीतच टेलिव्हिजन क्षेत्रात स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली होती. कुमकुम भाग्य, वागले की दुनिया आणि दिलवाली दुल्हा ले जायेंगी यांसारख्या मालिकांमधील तिच्या भूमिकांना प्रेक्षकांची पसंती मिळाली होती. तिच्या सहज अभिनयामुळे ती घराघरांत पोहोचली होती. टेलिव्हिजन सोबतच संचिता चित्रपटांमध्येही झळकली होती. विकी कौशल अभिनित छावा या चित्रपटात तिने महत्त्वाची भूमिका साकारली होती. अभिनय क्षेत्रात पुढील वाटचाल करण्यासाठी ती प्रयत्नशील असल्याचे तिच्या कामातून दिसून येत होते.

# शिवसेनेचे पाच खासदार फुटल्याच्या चर्चा

## राजकीय वर्तुळात'ऑपरेशन टायगर'चा दावा

मुंबई/प्रतिनिधी-शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी बोलवलेल्या बैठकीस ९ पैकी ४ खासदार उपस्थित राहिल्याने ठाकरेंचे ५ खासदार उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंच्या संपर्कात असल्याच्या चर्चांनी आज राजकीय वर्तुळात खळबळ माजवली. दरम्यान खा.संजय राऊत यांनी मात्र चार खासदार प्रत्यक्ष बैठकीस हजर होते. इतर पाच खासदार ऑनलाईन फोन द्वारे बैठकीत सहभागी झाले असल्याचे सांगत शिवसेनेत कुठलीही फुट पडली नसल्याचा दावा केला.

राज्यात सुरू असलेल्या कथित 'ऑपरेशन टायगर'च्या चर्चांदरम्यान शिवसेना (ठाकरे गट) मध्ये पुन्हा एकदा मोठ्या राजकीय घडामोडींना वेग आला आहे. पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी घेतलेल्या महत्त्वाच्या बैठकीला नऊपैकी केवळ चार खासदार उपस्थित राहिल्याने राजकीय वर्तुळात विविध तर्कवितर्कांना उधाण आले आहे. त्यातच खा.संजय राऊत तातडीने दिल्लीला रवाना झाल्याने या घडामोडींना अधिकच महत्त्व प्राप्त झाले आहे. सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या कार्यपद्धतीबाबत काही खासदारांमध्ये नाराजी असल्याचे सांगितले जात आहे. नुकताच झालेला आदित्य ठाकरे यांचा वाढदिवस तसेच 'मातोश्री'वर आयोजित करण्यात आलेल्या बैठकीलाही पाच खासदार अनुपस्थित राहिल्यामुळे ठाकरे गटात सर्वकाही सुरळीत नसल्याचे चित्र पुन्हा एकदा समोर आले आहे. ***पान ४ वर***

# बनावट दाखले घोटाळा प्रकरणी दोन महसूल अधिकाऱ्यांवर गुन्हा दाखल

मुंबई/प्रतिनिधी-वारसा, रहिवास आणि उत्पन्न प्रमाणपत्रांच्या वितरणात डिजिटल स्वाक्षरीचा गैरवापर करून शेकडो दाखले जारी केल्याचा धक्कादायक प्रकार मुंबईत उघडकीस आला आहे. या प्रकरणाची गंभीर दखल घेत महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी चौकशीचे आदेश दिल्यानंतर मुंबई शहर सामान्य प्रशासन विभागाचे उपजिल्हाधिकारी गणेश सांगळे आणि महसूल सहाय्यक नागनाथ लोलेवार यांच्याविरुद्ध माता रमाबाई आंबेडकर मार्ग पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

तक्रारीनुसार, संबंधित अधिकाऱ्यांनी पदाचा आणि प्रशासकीय अधिकारांचा गैरवापर करत डिजिटल स्वाक्षरी (डीएससी) प्रणालीचा वापर करून आपले सरकार पोर्टल तसेच सेतू केंद्रांमार्फत विविध प्रमाणपत्रे जारी केली. प्राथमिक तपासात अनेक प्रमाणपत्रे आवश्यक कागदपत्रे, पुरावे आणि पडताळणी न करता मंजूर करण्यात आल्याचे निष्पन्न झाले आहे.महसूल विभागाच्या माहितीनुसार, एफ/साऊथ आणि एफ/नॉर्थ विभागाचे तहसीलदार संदीप आवारी हे ८ मे २०२६ पासून रजेवर गेल्यानंतर त्यांचा अतिरिक्त कार्यभार तहसीलदार संकेत यमगर यांच्याकडे सोपविण्यात आला होता. याच कालावधीत उपजिल्हाधिकारी गणेश सांगळे यांनी नायब तहसीलदार दीपाली कुलकर्णी यांना डिजिटल स्वाक्षरी तयार करण्याचे तोंडी निर्देश दिल्याचा आरोप आहे. कुलकर्णी यांनी तयार केलेली डिजिटल स्वाक्षरी नंतर त्यांच्या संमतीशिवाय वापरण्यात आल्याचे तपासात समोर आले आहे.चौकशीदरम्यान गणेश सांगळे आणि नागनाथ लोलेवार यांनी संगनमत करून एफ/साऊथ आणि एफ/नॉर्थ विभागात मोठ्या प्रमाणावर दाखले वितरित केल्याचा संशय व्यक्त करण्यात आला आहे. यानंतर महसूल विभागाने चार अधिकाऱ्यांचे विशेष तपास पथक स्थापन करून जारी करण्यात आलेल्या सर्व प्रमाणपत्रांची पडताळणी सुरू केली आहे.कार्यकारी दंडाधिकारी धैर्यशील जाधव यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, गेल्या महिनाभरात एकूण २ हजार ३९ प्रमाणपत्रे वितरित करण्यात आली होती. त्यापैकी १ हजार २३ प्रमाणपत्रांची तपासणी पूर्ण करण्यात आली असून, त्यामध्ये २२१ प्रमाणपत्रे बनावट असल्याचे आढळून आले आहे. ही प्रमाणपत्रे आवश्यक पुरावे आणि कागदपत्रांशिवाय तसेच निर्धारित प्रक्रियेचे पालन न करता जारी करण्यात आल्याचे स्पष्ट झाले आहे.या प्रकरणी भारतीय न्याय संहितेच्या कलम ३१९ (२), ३३५ आणि ३ (५) तसेच माहिती तंत्रज्ञान अधिनियम, २००० मधील कलम ६६ (सी), ६६ (डी) आणि ७४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.दरम्यान, महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी केवळ गुन्हा दाखल करून हे प्रकरण संपविण्यात येणार नसल्याचे स्पष्ट करत, संशयास्पद सर्व प्रमाणपत्रांची सखोल चौकशी करण्यात येईल आणि गैरव्यवहारात सहभागी असलेल्या प्रत्येकावर कठोर कारवाई केली जाईल, असा इशारा दिला.

# संभाजीनगरचा न्याय नांदेडलाही लागू होणार का?

## जिल्हा बँक निवडणुकीत अपात्र बाबत समाधान जाधवांचा थेट आरोप

माहूर/प्रतिनिधी-जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांच्या निवडणुकांमध्ये उमेदवारांच्या पात्रतेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. संभाजीनगर जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या निवडणुकीत माजी मंत्री आ.अब्दुल सत्तार यांचे पुत्र अब्दुल समीर यांचा उमेदवारी अर्ज बँकेचे लाभार्थी असल्याच्या कारणावरून बाद ठरवण्यात आल्यानंतर राज्यभर राजकीय व कायदेशीर चर्चा रंगल्या असतानाच, नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या निवडणुकीतही तत्सम प्रकरण समोर आल्याचा खळबळजनक



आरोप करण्यात आला आहे.

जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष समाधान जाधव यांनी केलेल्या आरोपानुसार, नांदेड शहरातील जिल्हा बँकेची वसंतनगर शाखा ज्या इमारतीत कार्यरत आहे ती इमारत केशवे कुटुंबाच्या मालकीची असून त्या कुटुंबाला बँकेकडून थेट भाडे मिळत आहे. त्यामुळे संबंधित कुटुंब हे बँकेचे आर्थिक लाभार्थी ठरत असल्याचा दावा त्यांनी केला आहे. विशेष म्हणजे, याच कुटुंबातील एक सदस्य विद्यमान संचालक असून आगामी जिल्हा बँक निवडणुकीतील संभाव्य उमेदवार असल्याचे सांगितले जात आहे. त्यामुळे सहकारी संस्थांच्या निवडणुकीतील हितसंबंधांचा संघर्ष आणि अपात्रतेच्या तरतुदींचा प्रश्न पुन्हा एकदा चर्चेत आला आहे. संभाजीनगर प्रकरणात अब्दुल समीर यांचे कृषी पणन संस्था व वैयक्तिक मतदारसंघातील दोन्ही अर्ज बाद करण्यात आले होते. सोयगाव येथील जिल्हा बँकेची शाखा त्यांच्या मालकीच्या जागेत भाडेतत्त्वावर असल्याने ते बँकेचे लाभार्थी ठरतात, असा निष्कर्ष निवडणूक प्रक्रियेदरम्यान काढण्यात आला होता.या निर्णयावर प्रतिक्रिया देताना माजी मंत्री अब्दुल सत्तार यांनी संबंधित नियमाचा चुकीचा अर्थ लावल्याचा आरोप केला होता. मात्र नांदेडमधील परिस्थिती वेगळी असून, संबंधित व्यक्ती यापूर्वी संचालकपदावर कार्यरत असल्याने आणि त्याचवेळी बँकेकडून आर्थिक लाभ घेत असल्याचा आरोप असल्याने अपात्रतेच्या तरतुदी अधिक गंभीरपणे लागू होऊ शकतात, असा दावा समाधान जाधव यांनी केला आहे. जर संभाजीनगरमध्ये भाडे मिळत असल्याच्या ***पान ४ वर***

# अस्मानी संकट आणि सरकारची परीक्षा

**जागतिक तापमानवाढ, हवामानातील अनियमित बदल आणि त्यातून निर्माण होणारी जलटंचाई ही आज केवळ पर्यावरणाची समस्या राहिलेली नाही, तर ती मानवी अस्तित्वासमोरील सर्वात मोठी आव्हाने बनली आहेत. सध्या जगभरात एल-निनो आणि हवामान बदलाच्या परिणामांमुळे अनेक देश चिंतेत आहेत. भारतही त्याला अपवाद नाही. हवामान तज्ज्ञांनी गेल्या पंधरा-सोळा वर्षांपासून ग्लोबल वॉर्मिंगमुळे भविष्यात उद्भवणाऱ्या संकटांचा इशारा दिला होता. मात्र विकासाच्या अंधाधुंद शर्यतीत मानवाने या इशाऱ्यांकडे दुर्लक्ष केले आणि त्याची किंमत आता संपूर्ण जगाला मोजावी लागत आहे. भारताच्या संदर्भात पाहिले तर रस्ते, उद्योग आणि पायाभूत सुविधांच्या विकासाच्या नावाखाली मोठ्या प्रमाणावर पर्यावरणाची हानी झाली आहे. निसर्गाने नटलेल्या डोंगर-दऱ्या, जंगलांचे क्षेत्र आणि जैवविविधतेची केंद्रे विकासकामांसाठी नष्ट करण्यात आली. महाराष्ट्रातील गडचिरोलीसारख्या भागात उद्योगधंद्यांच्या विस्तारासाठी जंगलतोड सुरूच आहे. नाशिकमध्ये होणाऱ्या कुंभमेळ्याच्या तयारीसाठी तपोवन परिसरातील शेकडो वर्षे जुनी झाडे तोडली जात असल्याच्या घटना समोर येत आहेत. अशा परिस्थितीत पर्यावरणीय समतोल बिघडणार नाही, असा दावा कोणीही करू शकत नाही. दुर्दैवाची बाब म्हणजे शासन आणि प्रशासन अनेकदा या प्रश्नांकडे सोयीस्कर दुर्लक्ष करताना दिसते. पर्यावरण संवर्धनाच्या घोषणा केल्या जातात, परंतु प्रत्यक्षात विकास आणि पर्यावरण यांच्यातील समतोल राखण्यासाठी ठोस पावले उचलली जात नाहीत. परिणामी, देशासह महाराष्ट्रात यंदा कमी पावसाची शक्यता वर्तविण्यात आली आहे. हवामानातील बदल आणि एल-निनोच्या प्रभावामुळे पुढील काही वर्षे पाण्याची टंचाई तीव्र होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. एकीकडे लोकसंख्या झपाट्याने वाढत आहे, तर दुसरीकडे पाण्याचा अपव्ययही वाढत आहे. शहरांमध्ये चैनीच्या वापरासाठी आणि उद्योगधंद्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर पाणी खर्च केले जाते. ग्रामीण भागातही पाण्याचा कार्यक्षम वापर करण्याऐवजी पारंपरिक आणि अपव्ययी पद्धती कायम आहेत. विशेषतः शेती क्षेत्रात ऊस, हळद, सोयाबीन, केळी यांसारख्या अधिक पाणी लागणाऱ्या पिकांचे क्षेत्र वाढत आहे. महाराष्ट्रासारख्या दुष्काळप्रवण राज्यात ही बाब चिंताजनक आहे. जलस्रोतांची उपलब्धता आणि पिकांचे नियोजन यांचा मेळ न बसल्यास भविष्यातील संकट अधिक गंभीर होणार आहे.राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या संभाव्य संकटावर मात करण्यासाठी उपाययोजना सुरू असल्याचे सांगितले आहे. ही सकारात्मक बाब असली तरी केवळ घोषणा पुरेशा नाहीत. पेरणीचे दिवस सुरू असताना शेतकऱ्यांना कमी पाणी लागणाऱ्या पर्यायी पिकांकडे वळविण्यासाठी प्रभावी धोरणांची आवश्यकता आहे. जलसंधारण, सूक्ष्म सिंचन, पिकांचे वैज्ञानिक नियोजन आणि भूजल व्यवस्थापन यावर भर देणे गरजेचे आहे. त्याचबरोबर उद्योगधंद्यांनाही पाण्याचा पुनर्वापर आणि बचतीचे बंधनकारक नियम लागू करणे आवश्यक आहे. आज गरज आहे ती केवळ पावसाची वाट पाहण्याची नाही, तर उपलब्ध जलसंपत्तीचे सुयोग्य व्यवस्थापन करण्याची. शासन, प्रशासन, उद्योग क्षेत्र, शेतकरी आणि सामान्य नागरिक या सर्वांनी सामूहिक जबाबदारी स्वीकारली पाहिजे. अन्यथा भविष्यातील पिढ्यांना पाण्यासाठी संघर्ष करावा लागेल. पाणी हा जीवनाचा मूलभूत स्रोत आहे आणि त्याचे संरक्षण ही काळाची गरज आहे. स्वातंत्र्यपूर्व काळातील पिढी अनेकदा सांगायची की; भविष्यातील युद्धे जमीन किंवा संपत्तीसाठी नव्हे, तर पाण्यासाठी होतील. त्या वेळी हे विधान अतिशयोक्ती वाटत होते. मात्र आजची परिस्थिती पाहता त्यातील वास्तव अधिक स्पष्ट होत आहे. देशातील अनेक भागांत पाण्यासाठी संघर्ष, आंदोलन आणि वाद वाढताना दिसत आहेत. जर आजही आपण पर्यावरण संवर्धन आणि जलव्यवस्थापनाला सर्वोच्च प्राधान्य दिले नाही, तर उद्याचे संकट अधिक भीषण असेल. अस्मानी संकटाचे रूपांतर मानवनिर्मित आपत्तीत होऊ नये, यासाठी शासनाच्या धोरणात्मक निर्णयांसोबतच समाजाच्या वर्तनातही बदल आवश्यक आहे. हीच खरी सरकारची परीक्षा असून, त्यात यश मिळविण्यासाठी दूरदृष्टी, नियोजन आणि सामूहिक प्रयत्नांची नितांत गरज आहे.**

# वृद्धांचा सन्मान : अत्याचारमुक्त समाजाची गरज

१५ जून हा दिवस जगभरात 'जागतिक वृद्ध अत्याचार जागरूकता दिन' म्हणून साजरा केला जातो. हा दिवस वृद्ध व्यक्तींवरील वाढत्या अत्याचारांच्या समस्येकडे समाजाचे, शासनाचे आणि जागतिक समुदायाचे लक्ष वेधण्यासाठी अत्यंत महत्त्वाचा मानला जातो. मानवी जीवनाच्या विविध टप्प्यांपैकी वृद्धत्व हा अत्यंत संवेदनशील आणि अपरिहार्य टप्पा आहे. प्रत्येक व्यक्तीला एक ना एक दिवस या अवस्थेत प्रवेश करावाच लागतो. आयुष्यभर कुटुंबासाठी, समाजासाठी आणि राष्ट्राच्या उभारणीसाठी योगदान देणाऱ्या व्यक्तींना त्यांच्या आयुष्याच्या उत्तरार्धात सन्मान, सुरक्षितता, प्रेम आणि आधार मिळणे अपेक्षित असते. परंतु बदलत्या सामाजिक संरचनेमध्ये, वाढत्या व्यक्तिकेंद्री विचारसरणीमध्ये आणि कौटुंबिक नात्यांमधील दुराव्यामुळे अनेक वृद्ध व्यक्तींना विविध प्रकारच्या अत्याचारांना सामोरे जावे लागत आहे. त्यामुळे वृद्ध अत्याचार हा केवळ वैयक्तिक किंवा कौटुंबिक प्रश्न राहिलेला नसून तो एक गंभीर सामाजिक आणि मानवी हक्कांचा प्रश्न बनला आहे.




भारतीय संस्कृतीमध्ये ज्येष्ठांचा आदर करण्याची परंपरा प्राचीन काळापासून दिसून येते. अनेक ग्रंथांमध्ये आई-वडिलांचा सन्मान करण्याची शिकवण देण्यात आली आहे. मातृदेवो भव, पितृदेवो भव ही संकल्पना भारतीय संस्कृतीच्या केंद्रस्थानी राहिली आहे. संयुक्त कुटुंबपद्धतीमध्ये वृद्ध व्यक्ती हे कुटुंबाचे मार्गदर्शक, निर्णयकर्ते आणि अनुभवांचे भांडार मानले जात होते. त्यांच्या अनुभवाचा उपयोग पुढील पिढ्यांच्या घडणीत होत असे. परंतु कालांतराने औद्योगिकीकरण, शहरीकरण, शिक्षणासाठी व रोजगारासाठी होणारे स्थलांतर, अणुकुटुंबपद्धतीचा वाढता प्रभाव आणि बदलती जीवनशैली यांमुळे ज्येष्ठ नागरिकांचे स्थान बदलू लागले. अनेक वृद्ध व्यक्तींना एकाकीपणा, दुर्लक्ष आणि भावनिक असुरक्षिततेचा सामना करावा लागतो. वृद्ध अत्याचार ही संकल्पना व्यापक आहे. जागतिक आरोग्य संघटनेनुसार, विश्वासाच्या नात्यामध्ये वृद्ध व्यक्तीवर होणारी कोणतीही कृती किंवा दुर्लक्ष ज्यामुळे त्या व्यक्तीला हानी, दुःख किंवा त्रास सहन करावा लागतो, त्याला वृद्ध अत्याचार असे म्हणतात. हा अत्याचार शारीरिक, मानसिक, आर्थिक, भावनिक किंवा सामाजिक स्वरूपाचा असू शकतो. अनेकदा अत्याचार करणारी व्यक्ती ही वृद्ध व्यक्तीची स्वतःची मुले, नातेवाईक, काळजीवाहक किंवा इतर परिचित व्यक्ती असते. त्यामुळे या प्रकारच्या अत्याचाराची तीव्रता अधिक वाढते.

शारीरिक अत्याचारामध्ये वृद्धांना मारहाण करणे, त्यांना जबरदस्तीने ढकलणे, त्यांच्या हालचालींवर बंधने घालणे किंवा आवश्यक वैद्यकीय उपचारांपासून वंचित ठेवणे यांचा समावेश होतो. वृद्ध व्यक्तींची शारीरिक क्षमता कमी झालेली असल्यामुळे अशा प्रकारच्या अत्याचारांचा त्यांच्या आरोग्यावर गंभीर परिणाम होऊ शकतो. मानसिक किंवा भावनिक अत्याचारामध्ये सतत अपमान करणे, त्यांची टिंगल करणे, धमकावणे, त्यांच्याकडे दुर्लक्ष करणे किंवा त्यांना कुटुंबातील निर्णयांपासून दूर ठेवणे यांचा समावेश होतो. यामुळे वृद्ध व्यक्तींमध्ये नैराश्य, भीती आणि आत्मविश्वासाचा अभाव निर्माण होतो. आर्थिक अत्याचार हा आजच्या काळात वृद्धांवरील अत्याचाराचा अत्यंत गंभीर प्रकार ठरत आहे. वृद्ध व्यक्तींच्या संपत्तीवर बळजबरीने ताबा मिळविणे, त्यांच्या पेन्शन किंवा बचतीचा गैरवापर करणे, फसवणूक करून कागदपत्रांवर स्वाक्षऱ्या घेणे किंवा त्यांच्या आर्थिक निर्णयांवर नियंत्रण ठेवणे यांसारख्या घटना वाढताना दिसत आहेत. अनेक वृद्ध व्यक्ती आर्थिकदृष्ट्या आपल्या कुटुंबीयांवर अवलंबून असल्यामुळे किंवा भावनिक कारणांमुळे अशा अत्याचाराविरोधात आवाज उठवत नाहीत.

दुर्लक्ष हा वृद्ध अत्याचाराचा आणखी एक महत्त्वाचा प्रकार आहे. वृद्ध व्यक्तींना वेळेवर अन्न न देणे, त्यांच्या आरोग्याची काळजी न घेणे, औषधोपचार टाळणे किंवा त्यांच्या मूलभूत गरजांकडे दुर्लक्ष करणे यामुळे त्यांच्या शारीरिक आणि मानसिक आरोग्यावर विपरीत परिणाम होतो. काही वेळा वृद्ध व्यक्तींना कुटुंबामध्ये पूर्णपणे एकटे पाडले जाते, त्यांच्याशी संवाद साधला जात नाही किंवा त्यांना ओझे समजले जाते. हे दुर्लक्षही अत्याचाराचेच एक रूप आहे. जागतिक वृद्ध अत्याचार जागरूकता दिनाची संकल्पना वृद्ध व्यक्तींवरील अत्याचाराच्या वाढत्या घटनांच्या पार्श्वभूमीवर उदयास आली. संयुक्त राष्ट्रसंघाने वृद्ध व्यक्तींच्या हक्कांच्या संरक्षणाला प्राधान्य देत या विषयाकडे जागतिक समुदायाचे लक्ष वेधण्याचे प्रयत्न सुरू केले. या दिवसाचा उद्देश वृद्ध अत्याचाराविषयी जनजागृती निर्माण करणे, अत्याचाराची कारणे आणि परिणाम समजून घेणे तसेच त्याच्या प्रतिबंधासाठी सामूहिक कृतीला प्रोत्साहन देणे हा आहे. भारतामध्ये वृद्धांची संख्या सातत्याने वाढत आहे. आरोग्य सुविधांमध्ये झालेली सुधारणा आणि वाढलेले आयुर्मान यांमुळे वृद्ध लोकसंख्येचे प्रमाण वाढले आहे. लोकसंख्येतील या बदलामुळे वृद्धांच्या गरजा, समस्या आणि हक्क यांचा विचार करणे अधिक महत्त्वाचे ठरले आहे. आर्थिक सुरक्षितता, आरोग्य सेवा, सामाजिक संरक्षण आणि भावनिक आधार या वृद्धांच्या मूलभूत गरजा आहेत. परंतु अनेक वृद्ध व्यक्तींना या गरजांची पूर्तता होत नसल्याचे दिसून येते.

**डॉ.राजेंद्र बगाटे**

वृद्ध अत्याचारामागील कारणांचा विचार केला असता अनेक सामाजिक, आर्थिक आणि मानसिक घटक समोर येतात. आर्थिक अवलंबित्व हे त्यांपैकी एक प्रमुख कारण आहे. अनेक वृद्ध व्यक्ती निवृत्तीनंतर आर्थिकदृष्ट्या कुटुंबातील इतर सदस्यांवर अवलंबून राहतात. काही वेळा संपत्तीच्या वादांमुळे किंवा आर्थिक स्वार्थापोटी त्यांच्यावर अत्याचार केले जातात. व्यसनाधीनता, बेरोजगारी, कौटुंबिक तणाव आणि काळजीवाहकांवर येणारा मानसिक ताण यांमुळेही वृद्ध अत्याचाराची शक्यता वाढते. अत्याचाराचे परिणाम वृद्ध व्यक्तींच्या जीवनावर दूरगामी स्वरूपाचे असतात. सततचा मानसिक ताण, अपमान आणि दुर्लक्ष यांमुळे त्यांच्यामध्ये नैराश्य, चिंता आणि एकाकीपणाची भावना निर्माण होते. शारीरिक अत्याचारामुळे त्यांच्या आरोग्याच्या समस्या अधिक गंभीर होऊ शकतात. काही वृद्ध व्यक्ती अत्याचार सहन करण्यास कँटाळून सामाजिक जीवनापासून दूर जातात. अत्यंत गंभीर परिस्थितीत आत्महत्येचे विचारही त्यांच्या मनात येऊ शकतात. वृद्ध महिलांची परिस्थिती विशेषतः अधिक संवेदनशील असते. विधवापण, आर्थिक परावलंबित्व, शिक्षणाचा अभाव आणि सामाजिक भेदभाव यांमुळे त्यांना अधिक असुरक्षित परिस्थितीचा सामना करावा लागतो. ग्रामीण भागामध्ये राहणाऱ्या वृद्ध महिलांना आरोग्य सुविधा आणि सामाजिक सुरक्षेचा अभाव अधिक तीव्रतेने जाणवतो. त्यामुळे वृद्ध महिलांसाठी विशेष धोरणे आणि संरक्षणात्मक उपाययोजनांची गरज आहे.

भारतात वृद्धांच्या संरक्षणासाठी विविध कायदेशीर तरतुदी करण्यात आल्या आहेत. 'पालक आणि वरिष्ठ नागरिक यांचे पालनपोषण व कल्याण अधिनियम, २००७' हा कायदा त्यापैकी महत्त्वाचा आहे. या कायद्याअंतर्गत मुलांना आणि वारसदारांना वृद्ध पालकांच्या देखभालीची जबाबदारी सोपविण्यात आली आहे. वृद्ध व्यक्तींना त्यांच्या पालनपोषणासाठी न्यायाधिकरणा मार्फत आर्थिक सहाय्य मिळविण्याचा अधिकार देण्यात आला आहे. याशिवाय, वृद्धांच्या मालमत्तेचे संरक्षण करण्यासाठीही विविध तरतुदी करण्यात आल्या आहेत. केंद्र आणि राज्य शासनाकडून वृद्धांच्या कल्याणासाठी अनेक योजना राबविण्यात येतात. वृद्धापकाळ निवृत्ती वेतन योजना, आरोग्यविषयक सुविधा, ज्येष्ठ नागरिकांसाठी विविध सवलती, हेल्पलाइन सेवा आणि वृद्धाश्रमांच्या माध्यमातून वृद्धांना आधार देण्याचा प्रयत्न केला जातो. तथापि, या योजनांची प्रभावी अंमलबजावणी आणि त्याविषयी व्यापक जनजागृती होणे आवश्यक आहे. स्वयंसेवी संस्था आणि सामाजिक संघटनाही वृद्धांच्या जीवनमान उंचावण्यासाठी महत्त्वाची भूमिका बजावतात. वृद्धांसाठी समुपदेशन सेवा, आरोग्य तपासणी शिबिरे, कायदेशीर मदत आणि सामाजिक सहभागाचे कार्यक्रम आयोजित करून त्यांना मानसिक आणि सामाजिक आधार दिला जातो. अशा संस्थांच्या कार्यामुळे अनेक वृद्ध व्यक्तींना नव्याने जगण्याची प्रेरणा मिळते. कुटुंब ही वृद्धांच्या संरक्षणाची सर्वात महत्त्वाची संस्था आहे. वृद्धांना प्रेम, सन्मान आणि भावनिक आधार देणे ही प्रत्येक कुटुंबाची जबाबदारी आहे. त्यांच्यासोबत संवाद साधणे, त्यांच्या अनुभवांना महत्त्व देणे आणि कौटुंबिक निर्णयप्रक्रियेमध्ये त्यांचा सहभाग सुनिश्चित करणे आवश्यक आहे. वृद्धांना ओझे समजण्याऐवजी त्यांना कुटुंबाचा अविभाज्य भाग म्हणून स्वीकारणे ही काळाची गरज आहे. शैक्षणिक संस्थांमध्ये मूल्यशिक्षणाद्वारे विद्यार्थ्यांमध्ये ज्येष्ठांविषयी आदरभाव निर्माण करणे आवश्यक आहे. पिढ्यांमधील संवाद वाढविणारे उपक्रम राबविल्यास तरुण पिढीला वृद्धांच्या अनुभवांचे महत्त्व समजून घेता येईल. माध्यमांनीही वृद्धांच्या प्रश्नांना संवेदनशीलतेने हाताळत सकारात्मक जनजागृती घडवून आणणे आवश्यक आहे. डिजिटल युगात वृद्ध व्यक्तींना तंत्रज्ञानाची माहिती करून देणेही महत्त्वाचे ठरते. ऑनलाइन फसवणुकीपासून बचाव करण्यासाठी डिजिटल साक्षरता आवश्यक आहे. तसेच आधुनिक तंत्रज्ञानाच्या मदतीने दूर राहणाऱ्या कुटुंबीयांशी संपर्क साधणे आणि सामाजिक संबंध टिकवून ठेवणे शक्य होते.

वृद्धत्व हा जीवनाचा नैसर्गिक टप्पा आहे. आजचे वृद्ध हे कालचे समाजनिर्माते, कुटुंबाचे आधारस्तंभ आणि राष्ट्राच्या विकासात योगदान देणारे नागरिक आहेत. त्यांच्या कष्टामुळे आणि त्यागामुळे अनेक पिढ्या घडल्या आहेत. त्यामुळे त्यांच्या आयुष्याच्या उत्तरार्धात त्यांना सन्मानाने आणि सुरक्षिततेने जगण्याची संधी उपलब्ध करून देणे हे समाजाचे नैतिक कर्तव्य आहे. जागतिक वृद्ध अत्याचार जागरूकता दिन हा आपल्याला आत्मपरीक्षण करण्याची संधी देतो. आपण आपल्या घरातील वृद्ध व्यक्तींशी कसे वागतो, त्यांच्या गरजांकडे कितपत लक्ष देतो आणि त्यांना कितपत सन्मान देतो याचा विचार करण्याची गरज आहे. वृद्धांचा सन्मान ही केवळ औपचारिकता नसून ती आपल्या संस्कृतीची आणि मानवतेची खरी ओळख आहे. समाजाच्या प्रगतीचे मोजमाप केवळ आर्थिक विकासाच्या निकषांवर करता येत नाही. तो समाज आपल्या दुर्बल आणि ज्येष्ठ घटकांशी कसा वागतो यावरही त्याचे मूल्यमापन केले जाते. वृद्ध व्यक्तींचा सन्मान करणारा, त्यांच्या हक्कांचे संरक्षण करणारा आणि त्यांना सुरक्षित व आनंदी जीवन जगण्याची संधी देणारा समाजच खऱ्या अर्थाने सुसंस्कृत आणि प्रगत ठरतो.

१५ जूनच्या निमित्ताने आपण सर्वांनी वृद्ध अत्याचाराला ठामपणे नकार देण्याचा संकल्प केला पाहिजे. शासन, स्वयंसेवी संस्था, माध्यमे, शैक्षणिक संस्था आणि सर्वसामान्य नागरिक यांनी एकत्रितपणे कार्य करून वृद्धांसाठी अत्याचारमुक्त वातावरण निर्माण करण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत. वृद्धांच्या चेहऱ्यावर समाधानाचे हास्य फुलविणे आणि त्यांच्या जीवनात सुरक्षिततेची भावना निर्माण करणे हीच या दिनाची खरी सार्थकता ठरेल. आज आपण वृद्धांचा सन्मान करू, त्यांच्या हक्कांचे रक्षण करू आणि त्यांना प्रेमाने साथ देऊ, तर उद्याच्या आपल्या वृद्धत्वालाही सन्मानाची हमी मिळेल. त्यामुळे वृद्धांचा आदर - अत्याचाराला नकार हा संदेश प्रत्येक घरापर्यंत आणि प्रत्येक मनापर्यंत पोहोचविणे ही काळाची गरज आहे. वृद्धांचा सन्मान म्हणजे मानवतेचा सन्मान आणि अत्याचारमुक्त वृद्धत्व हीच सभ्य समाजाची खरी ओळख आहे.

# मेकॅनिकल इंजिनिअरिंगचे फायदे आणि तोटे...

२०२६-CET परीक्षेचा निकाल लवकरच जाहीर होणार असून अभियांत्रिकी महाविद्यालयांमधील प्रवेश प्रक्रिया सुरू होणार आहे. अशा वेळी विद्यार्थ्यांनी आणि पालकांनी शाखा निवडताना विविध अभियांत्रिकी शाखांमधील संधी, फायदे आणि मर्यादा यांचा सखोल विचार करणे आवश्यक आहे.

अभियांत्रिकीच्या प्रमुख शाखा-अभियांत्रिकीच्या शाखांचे साधारणपणे दोन गट केले जातात. १. नॉन-सर्किट शाखा

मेकॅनिकल इंजिनिअरिंग (यंत्र अभियांत्रिकी), सिव्हिल इंजिनिअरिंग (स्थापत्य अभियांत्रिकी), मेटलर्जी (धातुशास्त्र अभियांत्रिकी), केमिकल इंजिनिअरिंग (रसायन अभियांत्रिकी), इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंग (विद्युत अभियांत्रिकी) या अभियांत्रिकीच्या मूलभूत आणि पारंपरिक शाखा मानल्या जातात.



१. सर्किट शाखा इलेक्ट्रॉनिक्स इंजिनिअरिंग, कॉम्प्युटर इंजिनिअरिंग याशिवाय -IAML, Data Science, Cyber Security, Robotics, Mechatronics या आधुनिक उपशाखा आहेत. मेकॅनिकल इंजिनिअरिंग (यंत्र अभियांत्रिकी) मेकॅनिकल इंजिनिअरिंग ही अभियांत्रिकीची सर्वात जुनी आणि मूलभूत शाखा मानली जाते. मानवाच्या प्रगतीमध्ये यंत्रशास्त्राचा मोठा वाटा आहे. वाहननिर्मिती, उत्पादन उद्योग, ऊर्जा क्षेत्र, संरक्षण क्षेत्र, अवकाश संशोधन अशा अनेक क्षेत्रांमध्ये मेकॅनिकल अभियंत्यांचे योगदान महत्त्वाचे राहिले आहे.

स्वातंत्र्यानंतर भारताने जर्मनी, रशिया आणि इतर देशांकडून तंत्रज्ञान आत्मसात करून औद्योगिक विकासाला गती दिली. आजही उत्पादन (Manufacturing) आणि ऑटोमोबाईल क्षेत्रात मेकॅनिकल अभियंत्यांची मोठी गरज आहे. मेकॅनिकल इंजिनिअरिंगचे फायदे:-१. विविध क्षेत्रांमध्ये रोजगाराच्या संधी, मेकॅनिकल अभियंत्यांना खालीलप्रमाणे अनेक क्षेत्रांमध्ये काम करता येते: डिझाईन, प्रॉडक्ट डेव्हलपमेंट, प्रॉडक्शन, क्वालिटी कँट्रोल, मेंटेनन्स, मटेरियल मॅनेजमेंट, व्हेंडर डेव्हलपमेंट, टूल डिझाईन, प्रॉडक्ट टेस्टिंग, पर्चेस, सेल्स आणि मार्केटिंग, सॉफ्टवेअर प्रोग्रामिंग, अध्यापन (प्राध्यापक), बँकिंग क्षेत्र.

स्वतःचा उद्योग (Entrepreneurship) १. मजबूत तांत्रिक पाया मेकॅनिकल इंजिनिअरिंगचा अभ्यासक्रम विद्यार्थ्यांची विश्लेषण क्षमता, समस्या सोडविण्याची कौशल्ये आणि तांत्रिक समज विकसित करतो. १. उद्योगांसाठी कायमची गरज वाहन उद्योग, उत्पादन उद्योग, ऊर्जा प्रकल्प, संरक्षण क्षेत्र, रेल्वे, एरोस्पेस, ऑटोमेशन इत्यादी क्षेत्रांमध्ये मेकॅनिकल अभियंत्यांची सतत आवश्यकता असते.१. करिअरमध्ये लवचिकता मेकॅनिकल अभियंता आवश्यक कौशल्ये आत्मसात करून व्यवस्थापन, सॉफ्टवेअर, डेटा ॲनालिटिक्स, प्रोजेक्ट मॅनेजमेंट अशा विविध क्षेत्रांकडे वळू शकतो.

१. उद्योजकतेसाठी उत्तम शाखा उत्पादन, मशिनिंग, फॅब्रिकेशन, ऑटोमोबाईल सर्व्हिसिंग, औद्योगिक उपकरणे अशा क्षेत्रांत स्वतःचा व्यवसाय सुरू करण्याच्या मोठ्या संधी उपलब्ध असतात. मेकॅनिकल इंजिनिअरिंगचे तोटे १. सुरुवातीचा पगार तुलनेने कमी असू शकतो. सॉफ्टवेअर क्षेत्राच्या तुलनेत सुरुवातीच्या काळात वेतन काहीसे कमी असण्याची शक्यता असते. १. शिफ्टमध्ये काम करण्याची गरज-उत्पादन उद्योगांमध्ये दिवस-रात्र शिफ्टमध्ये काम करावे लागू शकते. १. प्रत्यक्ष उद्योगातील काम-कारखान्यांमध्ये प्रत्यक्ष उत्पादन प्रक्रियेशी संबंधित काम असल्याने कामाचे स्वरूप काहीवेळा आव्हानात्मक असते.

१. परदेशातील संधी तुलनेने कमी- सॉफ्टवेअर क्षेत्राच्या तुलनेत परदेशातील संधी मर्यादित असू शकतात, जरी अनुभवी अभियंत्यांना चांगल्या संधी उपलब्ध असतात. आजच्या काळातील वास्तव:-आज अनेक पालक आणि विद्यार्थी केवळ IT किंवा Computer Science शाखांकडे आकर्षित होताना दिसतात. मात्र मेकॅनिकल इंजिनिअरिंग ही अजूनही अत्यंत महत्त्वाची आणि रोजगारक्षम शाखा आहे. विशेषतः मेकॅनिकल अभियंत्याने CAD/CAM, Automation, Robotics, AI, Programming, Data Analytics यांसारखी आधुनिक कौशल्ये आत्मसात केली तर त्याच्यासाठी करिअरच्या संधी अधिक व्यापक होतात.

निष्कर्ष:- शाखा निवडताना केवळ सध्याचा ट्रेंड पाहू नये. विद्यार्थ्यांची आवड, क्षमता, कौशल्ये आणि दीर्घकालीन करिअरच्या संधी यांचा विचार करून निर्णय घ्यावा. मेकॅनिकल इंजिनिअरिंग ही आजही अभियांत्रिकी क्षेत्रातील एक मजबूत, बहुआयामी आणि भविष्यकालीन संधी देणारी शाखा आहे.

Choose Right College Today...Secure Bright Future Tomorrow.

**-प्रा.प्रमोद दस्तूरकर,** डायरेक्टर-प्लेसमेंट

(२५ वर्षांहून अधिक अनुभव असलेले अभियांत्रिकी प्राध्यापक, पुणे)

सायंदैनिक नांदेड वार्ता
* संपर्क कार्यालय *
व्ही.डी.देशपांडे भवन, सोमेश कम्पाऊंड, मिलगेट जवळ, नांदेड-१
**मुख्यसंपादक**-प्रदीप नागापूरकर,भ्रमणध्वनी ९४२२१७४७७४,
**सहसंपादक**-अविनाश पाटील, भ्रमणध्वनी ९४२१९९०८८८
E-mail: nandedwarta@mail.com

# माहूर तालुक्यात अंगणवाड्यांना मिळेना हक्काचं अंगण

## १४ इमारतींची प्रतीक्षा;बालकांचे भविष्य वाऱ्यावर..!




**सरफराज दोसानी**

माहूर-आदिवासी व डोंगराळ भाग म्हणून ओळखल्या जाणाऱ्या माहूर तालुक्यात बालकांच्या सर्वांगीण विकासासाठी सुरू करण्यात आलेल्या अंगणवाड्यांची अवस्था अत्यंत चिंताजनक बनली आहे. शासनाच्या कागदोपत्री योजना आणि प्रत्यक्षातील वास्तव यामध्ये मोठी दरी दिसून येत असून तब्बल १४ अंगणवाड्या आजही स्वतःच्या इमारतीच्या प्रतीक्षेत आहेत. त्यामुळे लहान चिमुकल्यांचे शिक्षण, पोषण आणि सुरक्षितता धोक्यात आली आहे.

शासन कोट्यवधी रुपये पोषण आहार, पूर्व प्राथमिक शिक्षण आणि बालविकास योजनांवर खर्च करत असताना अनेक अंगणवाड्या अजूनही मंदिर, समाजमंदिर, खासगी इमारती किंवा प्राथमिक शाळांच्या खोल्यांमध्ये भरविल्या जात आहेत. काही ठिकाणी तर जागेअभावी मुलांना अत्यंत गैरसोयीच्या वातावरणात बसून शिक्षण घ्यावे लागत आहे.माहूर तालुक्यात मंजूर असलेल्या १७४ अंगणवाड्यांपैकी १४ अंगणवाड्यांना अद्याप स्वमालकीची इमारत नाही, तर दोन अंगणवाड्या भाड्याच्या खोलीत सुरू आहेत. ज्या अंगणवाड्यांना स्वतःच्या इमारती आहेत त्यांपैकीही अनेक इमारती जीर्ण अवस्थेत असून पावसाळ्यात गळती, ओलावा आणि सुरक्षिततेच्या प्रश्नामुळे केंद्र बंद ठेवण्याची वेळ येते.विशेष म्हणजे ग्रामीण भागातील सर्वसामान्य आणि कष्टकरी कुटुंबांचा अंगणवाड्यांवर मोठा विश्वास आहे. खासगी शाळांच्या वाढत्या जाळ्यातही गरीब पालक आपल्या मुलांना अंगणवाडीत पाठवतात. कारण येथे शिक्षणासोबतच पोषक आहार, आरोग्य तपासणी आणि संस्कारांचे धडे दिले जातात. मात्र स्थानिक पातळीवरील राजकारण, निधीची कमतरता आणि प्रशासकीय उदासीनतेमुळे या महत्त्वाच्या योजनेला ग्रहण लागल्याची भावना व्यक्त होत आहे. बालकांमध्ये शिक्षणाची गोडी निर्माण करणे, कुपोषण रोखणे आणि प्राथमिक शिक्षणाचा मजबूत पाया घालणे हा अंगणवाडीचा मूलभूत उद्देश आहे. मात्र ज्यांच्या भविष्यासाठी या योजना राबवल्या जात आहेत, त्याच चिमुकल्यांना आज हक्काचे अंगण आणि सुरक्षित छप्पर मिळण्यासाठी प्रतीक्षा करावी लागत आहे, ही दुर्दैवी बाब आहे.स्थानिक नागरिक, पालक यांनी शासनाकडे तातडीने निधी उपलब्ध करून उर्वरित १४ अंगणवाड्यांच्या इमारतींचे बांधकाम पूर्ण करण्याची मागणी केली आहे. बालकांचे भविष्य घडविणाऱ्या अंगणवाड्यांनाच जर हक्काचे अंगण मिळत नसेल, तर विकासाच्या दाव्यांवर विश्वास ठेवायचा तरी कसा ? अशी तीव्र प्रतिक्रिया व्यक्त होत आहे.

## राहेरमध्ये श्रीमद भागवत कथा ज्ञानयज्ञ उत्साहात

नायगाव/प्रतिनिधी-अधिक मासाच्या पावन पर्वानिमित्त तीर्थक्षेत्र राहेर (ता. नायगाव) येथील प्राचीन व पवित्र श्री नृसिंह मंदिर परिसरात आयोजित करण्यात आलेला श्रीमद भागवत कथा ज्ञानयज्ञ सोहळा भक्तिमय वातावरणात संपन्न झाला.

दि.८ ते १४ जून दरम्यान आयोजित या ज्ञानयज्ञात ह.भ.प. मंदारबुवा रामदासी यांनी श्रीमद भागवत महापुराणाचे रसाळ निरूपण केले. दररोज दुपारी ३ ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत कथा पार पडली. कथा श्रवणासाठी



राहेर तसेच पंचक्रोशीतील भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावली. कथेमध्ये भक्ती, ज्ञान, वैराग्य, सदाचार आणि मानवकल्याणाचे संदेश देण्यात आले. ज्ञानयज्ञाच्या समारोप प्रसंगी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. संपूर्ण कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मंदिर समिती, ग्रामस्थ व भक्तगणांनी विशेष परिश्रम घेतले. ज्ञान यज्ञा दरम्यान आ.राजेश पवार यांच्या धर्मपत्नी पूनमताई पवार यांनी भेट देऊन कथेचे श्रवण केले तसेच उपस्थित भाविकांना मार्गदर्शन करत आपले मनोगत व्यक्त केले.

## शंभरहून अधिक गावांसाठी अतिरिक्त वीज खांब उभारण्याचे महावितरणला निर्देश

### खंडित वीजपुरवठ्यावरुन आ.केराम आक्रमक



किनवट/प्रतिनिधी-नादुरुस्त ट्रान्सफॉर्मरच्या दुरुस्तीला डिझेल नसल्याची सबब पुढे करून वीज पुरवठ्याकडे दुर्लक्ष केले जात असेल तर ते ऐकून घेतले जाणार नाही. उष्णतेच्या असह्य लाटेच्याक्षणीच वीज खंडितच्या प्रमाणात लक्षणीय वाढ झाली. समाजमाध्यतून व्यक्त झालेल्या लोकभावना पहाता आमदार भीमराव केरामांनी महावितरणच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांची महत्वपूर्ण बैठक घेऊन वीज पुरवठा सुरळीत करण्यासाठी सूचना दिल्या.

१३ जून रोजी किनवट येथे वीज महावितरण विभागाची स्वतंत्र आढावा बैठक घेतली होती. बैठकीदरम्यान वारंवार खंडित होणारा वीजपुरवठा, अनियमित अघोषित लोडशेडिंग, जुनाट व कमजोर विद्युत वाहक तारांसह खांबं बदलणे. आवश्यक त्या ठिकाणी नवीन डीपी आणि ट्रान्सफॉर्मर बसविणे तसेच शेतीपंपांचा वीज पुरवठा सुरळीत करा. किनवट-माहूर तालुक्यातील जवळपास शंभरपेक्षा अधिक गावांमध्ये अतिरिक्त विद्युत खांबांची आवश्यकता असून तातडीने पुरविण्याच्या आमदार केरामांनी सूचना दिल्या. विद्युत निरंतर सेवांतर्गत पाच ट्रॉन्सफार्मर दोन दिवसांत उपलब्ध होतील तर आणखी पाच ट्रॉन्सफार्मरला मंजुरी मिळाली असल्याचे बैठकी दरम्यान अधिकाऱ्यांनी स्पष्ट सांगितले. दहा ट्रॉन्सफार्मर आणि शंभर खांबं उपलब्ध झाल्यास वीज पुरवठा सुरळीत होण्यास मदत होईल असा विश्वास व्यक्त करण्यात आला. बैठकीदरम्यान नांदेड परिमंडळाचे कार्यकारी अभियंता गाडेकर, भोकर विभागाचे कार्यकारी अभियंता मंगेश बोरगांवकर, किनवट उप विभागाचे उपकार्यकारी अभियंता नामदेव केंद्रे, भोकरचे सहाय्यक अभियंता बिराजदार, विभागीय अधिकारी बिराजदार, उप अभियंता मेश्राम, किनवट शहरचे सहाय्यक अभियंता देशमुखे, सहाय्यक अभियंता किनवट ग्रामीण-१,चव्हाण, कनिष्ठ अभियंता किनवट ग्रामीण-२ क्षीरसागर, कनिष्ठ अभियंता बोधडी आदी अधिकारी उपस्थित होते.

## वर्तमानपत्रातील कागदात खाद्यपदार्थ देण्यावर बंदीची मागणी

देगलूर/प्रतिनिधी-देगलूर शहरातील अनेक हॉटेल्स, वडापाव केंद्रे, उपहारगृहे तसेच विविध खाद्यपदार्थ विक्री करणाऱ्या आस्थापनांमध्ये आजही वर्तमानपत्राच्या कागदामध्ये खाद्यपदार्थ देण्याची प्रथा सुरू असल्याचे दिसून येत आहे. या प्रकारामुळे नागरिकांच्या आरोग्याला गंभीर धोका निर्माण होण्याची शक्यता असल्याने अन्न व औषध प्रशासनाने याकडे गांभीर्याने लक्ष देऊन तात्काळ कारवाई करावी, अशी मागणी देगलूरकर नागरिकांनी सोशल मीडियाच्या माध्यमातून केली आहे.

नागरिकांच्या म्हणण्यानुसार, वर्तमानपत्रावर वापरण्यात येणाऱ्या शाईतील रासायनिक घटक व रंगद्रव्ये खाद्यपदार्थांच्या संपर्कात आल्यास ते अन्नामध्ये मिसळून आरोग्यावर विपरीत परिणाम करू शकतात. त्यामुळे खाद्यपदार्थांचे पॅकिंग व वितरणासाठी वर्तमानपत्राचा वापर पूर्णपणे बंद करण्यात यावा, अशी मागणी जोर धरू लागली आहे.अलीकडेच आयुक्त तुकाराम मुंडे यांनी नागरिकांच्या आरोग्याशी संबंधित बाबींमध्ये कोणतीही तडजोड सहन केली जाणार नाही, असा स्पष्ट संदेश दिल्यानंतर देगलूरमधील नागरिकांनीही या विषयाकडे प्रशासनाचे लक्ष वेधले आहे. यापूर्वीही अनेक वेळा वर्तमानपत्राच्या कागदात खाद्यपदार्थ देण्यास प्रतिबंध घालण्याची मागणी करण्यात आली होती. मात्र, नांदेड जिल्ह्यातील संबंधित यंत्रणांकडून या प्रश्नाकडे अपेक्षित गांभीर्याने लक्ष दिले गेले नसल्याची भावना नागरिकांमधून व्यक्त होत आहे.सोशल मीडियावर अनेक नागरिकांनी अन्न व औषध प्रशासन, स्थानिक स्वराज्य संस्था तसेच संबंधित विभागांनी संयुक्त तपासणी मोहीम राबवून नियमांचे उल्लंघन करणाऱ्या आस्थापनांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी केली आहे. नागरिकांच्या आरोग्याच्या दृष्टीने हा विषय अत्यंत महत्त्वाचा असून प्रशासनाने याबाबत तातडीने पावले उचलून वर्तमानपत्राच्या कागदात खाद्यपदार्थ देण्याच्या प्रथेला आळा घालावा, अशी अपेक्षा देगलूरकर नागरिकांकडून व्यक्त होत आहे.

## मालटेकडी-इस्लामपुरा अंडरब्रिजमधील पाणीसाठ्याचा प्रश्न ऐरणीवर

### उपाययोजना न झाल्यास अर्धनग्न जलसमाधी आंदोलनाचा इशारा

नांदेड/प्रतिनिधी-मालटेकडी-इस्लामपुरा परिसरातील रेल्वे अंडरग्राऊंड पुलाखाली पहिल्याच पावसात कमरेएवढे पाणी साचल्याने नागरिकांचे हाल होत असून सलग चार ते पाच दिवस या मार्गावरील वाहतूक ठप्प झाली होती. वारंवार उद्भवणाऱ्या या समस्येमुळे परिसरातील नागरिकांना मोठा मनस्ताप सहन करावा लागत असून तातडीने कायमस्वरूपी उपाययोजना करण्याची मागणी जोर धरू लागली आहे.

या अंडरब्रिजखाली पावसाचे पाणी साचू नये यासाठी यापूर्वीही महापालिका प्रशासनाकडे अनेकदा मागणी करण्यात आली होती. मात्र, आजपर्यंत कोणतीही ठोस कार्यवाही करण्यात आली नसल्याचा आरोप स्थानिक नागरिकांनी केला आहे. त्यामुळे येत्या पंधरा दिवसांत समस्या सोडविण्यात आली नाही, तर अंडरब्रिजमध्ये साचलेल्या घाण पाण्यात अर्धनग्न जलसमाधी आंदोलन करण्यात येईल, असा इशारा महापालिका आयुक्त डोईफोडे यांना दिलेल्या निवेदनाद्वारे देण्यात आला आहे. विशेष म्हणजे, काही महिन्यांपूर्वी याच परिसरात साचलेल्या पाण्यात पडून एका बालकाचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना घडली होती. ही घटना अद्याप नागरिकांच्या स्मरणात ताजी असताना पुन्हा अशा दुर्घटनांची पुनरावृत्ती होऊ नये, यासाठी महापालिकेने तातडीने प्रभावी उपाययोजना कराव्यात, अशी मागणी होत आहे. या अंडरब्रिजमधील पाणी-साठ्यामुळे नागरिकांच्या जीविताला धोका निर्माण झाला असून भविष्यात कोणतीही दुर्घटना घडल्यास त्यास सर्वस्वी महापालिका प्रशासन जबाबदार राहील, असा इशाराही स्थानिकांनी दिला आहे. दरम्यान, प्रश्नाकडे दुर्लक्ष झाल्यास लोकश्रेय मित्र मंडळाचे नांदेड जिल्हाध्यक्ष रविकांत गायकवाड यांच्या नेतृत्वाखाली अंडरब्रिजखाली साचलेल्या पाण्यात अर्धनग्न जलसमाधी आंदोलन करण्यात येणार असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. त्यामुळे पावसाळ्याच्या तोंडावर मालटेकडी-इस्लामपुरा अंडरब्रिजचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला असून महापालिका प्रशासन काय भूमिका घेते, याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

## भावकीच्या वादातून तुफान हाणामारी

नांदेड/प्रतिनिधी-नायगाव तालुक्यातील पळसगाव येथे रविवारी सकाळी आठच्या सुमारास राजकीय खुन्नस आणि शेतीच्या धुऱ्याच्या कारणावरुन दोन गटात जीवघेणी हाणामारी झाली. सरपंच गटाचे प्रतिनिधीत्व करणारे शिवाजी शिंदे यांच्या भावकीत आधी शाब्दिक बाचाबाची झाली आणि नंतर त्याचे रुपांतर हिंसक संघर्षात झाले. दोन्ही गटांनी एकमेकांवर कुऱ्हाडी, लोखंडी रॉड आणि खंजीरने हल्ला केला. या तुफान हाणामारीत बालाजी शिंदे, अविनाश शिंदे, आनंदा शिंदे, बळवंत शिंदे, नामदेव शिंदे यांच्यासह अन्य जण जखमी झाले. यापैकी बालाजी आणि अविनाश हे गंभीर जखमी असून त्यांच्यावर खासगी रुग्णालयात उपचार सुरु आहेत, तर उर्वरित जखमींना नांदेड येथील शासकीय रुग्णालयात हलवण्यात आले आहे.

## मुखेडमध्ये जुगार अड्ड्यावर पोलीसांची धाड

नांदेड/प्रतिनिधी-मुखेड शहरातील महाजन मंगल कार्यालया जवळ सुरु असलेल्या जुगार अड्ड्यावर रविवारी सायंकाळी पोलीसांनी धाड टाकुन पाच जणांना अटक केली.

महाजन मंगल कार्यालयाच्या बाजूला असलेल्या एका टिनशेडमध्ये जुगार अड्डा सुरु होता. रविवारी सायंकाळी पोलीसांच्या पथकाने जुगार अड्ड्यावर धाड टाकली. पैसे लावून तिर्रट नावाचा जुगार खेळत असतांना साईनाथ गणपत मुद्देवाड रा.वाल्मिकीनगर, मुखेड, शेख अहमद शेख खैरनिया रा. वाल्मिकीनगर, मुखेड, मैनु करीमसाब कुरेशी रा.राठोड गल्ली, मुखेड, सतीश व्यंकटराव रॅपनवाड रा.वडारगल्ली,मुखेड, चाँद सय्यद रा.कोळी गल्ली,मुखेड यांना रंगेहाथ पकडले. त्यांच्याकडून जुगाराचे साहित्य व रोख रक्कम पोलीसांनी जप्त केली आहे.


### जाहीर प्रगटन

नांदेड येथील ८ वे सह दिवाणी न्यायाधिश क.स्तर, नांदेड
यांच्या न्यायालयात
(समक्ष : ए.जी.चव्हाण)
किरकोळ दिवाणी अर्ज क्र.७६०/२०२६

अर्जदार : १. कांचन भ्र.दिलीप सांगळे वय : ५१ धंदा : घरकाम रा.मथुरा संकूल, कैलास नगर, वर्कशॉप कॉर्नर, नांदेड ता.जि.नांदेड, २. दिव्यांका पि.दिलीप सांगळे वय : २७ धंदा : खाजगी नौकरी, ३. तेजस पि.दिलीप सांगळे वय : २० धंदा : शिक्षण दोघेही रा.घर १०५ चिंतामणी अपार्टमेंट, कॅनाल रोड, चैतन्यनगर, तरोडा बु.नांदेड

विरुद्ध

गैरअर्जदार : निरंक

प्रकरण : कलम २ व ३ बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट नुसार वारसा प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी अर्जदार यांनी या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्याकरीता अर्ज केलेला आहे. अर्जदार क्र.१ ही पत्नी आहे. २ ही मुलगी आहे व अर्जदार क्र.३ हा मुलगा आहे. मयत नामे दिलीप पि.बाबाराव सांगळे यांचा मृत्यू दि.०६/०५/२०२६ रोजी झालेला आहे.

वर नमुद अर्जदारांशिवाय ईतर कोणीही मयतांचे कायदेशीर वारस नसल्याचे अर्जदारानी अर्जात कथन केले आहे, अर्जदारांनी मा. न्यायालयात अर्जदारांच्या नावे वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज दाखल केलेला आहे.

तरी प्रस्तुत प्रकरणी अर्जदारांच्या नावे वारसा प्रमाणपत्र देण्यास कोणास काही आक्षेप असल्यास त्यांनी तो स्वतः हजर राहून या न्यायालयात दि.१४/०७/२०२६ रोजी किंवा हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाच्या आत नोंदवावा, मुदतीनंतर येणाऱ्या आक्षेपाचा विचार करण्यात येणार नाही व अर्जाची पुढील सुनावणी करण्यात येईल.

आज दि.१५/०६/२०२६ रोजी माझ्या सहीने व मा.न्यायालयाच्या शिक्याने दिला.

स्वाक्षरित/-
**कनिष्ठ लिपीक**
सह दिवाणी न्यायालय
क.स्तर,नांदेड

आदेशावरुन
स्वाक्षरित/-
**स.अधिक्षक**
दिवाणी न्यायालय व.स्तर,नांदेड



### उपविभागीय अधिकारी तथा भुसंपादन अधिकारी कार्यालय देगलूर

### जाहीर प्रगटन

विषय : मौ.मुक्रमाबाद ता.मुखेड येथील सहधारकाचे स्वेच्छा अनुदान वितरण करणेबाबत.
नोटिस क्र.६६३

लेंडी प्रकल्पांतर्गत बुडीत गावातील मौ.मुक्रामबाद येथील स्वेच्छा अनुदान वितरित करणेसाठी उपरोक्त संबंधीत लाभधारकांना नोटिस क्र.६६३ देण्यात आल्या आहेत. सदर स्वेच्छा अनुदानाचे अनुषंगाने जमा कागदपत्राच्या अनुषंगाने अभिलेख तपासणी केले असता ई-स्टेमेंट क्र.२०० घर क्र.१०७/२, १०७/३ या नोटीस वर सुमनबाई काशीनाथ बोयावार व वामनराव गंगाधर यांच्या नावांची नोंद दिसुन येत असुन संबंधित अर्जदार यांचे म्हणणे आहे की निवाड्यातील नाव वामनराव गंगाधर यांचेशी माझा काहीही संबंध नसुन निवाड्यामध्ये चुकीचे नाव पडलेले आहे तरी सदर नाव कमी करुन अनुदान जमा करण्यात यावे असे कळविले आहे.

करिता खालील तपशीलाप्रमाणे सदर नावाशी आपले काही आक्षेप असल्यास ०७ दिवसाच्या आत आपण किंवा आपल्या विधिज्ञा मार्फत या कार्यालयात लेखी म्हणणे सादर करावे. अन्यथा आपले काहीही आक्षेप किंवा हरकती प्राप्त झाले नसल्यास सबंधितास मावेजा अदा करण्यात येईल.

| अ.क्र. | नोटिस क्र. | नोटिसधारक | अनुदान मागणीबाबतचा अर्ज प्राप्त | नोटीस व निवाड्यात असलेले नोंद |
| --- | --- | --- | --- | --- |
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | ६६३ | सुमनबाई काशीनाथ बोयावार व वामनराव गंगाधर | सुमनबाई काशीनाथ बोयावार | सुमनबाई काशीनाथ बोयावार व वामनराव गंगाधर |

स्वाक्षरित/-
**(अनुप पाटील)**
उपविभागीय अधिकारी तथा
भूसंपादन अधिकारी देगलुर


## देगलूर उपजिल्हा रुग्णालयात सात रुग्णांवर यशस्वी मोतीबिंदू शस्त्रक्रिया

देगलूर/प्रतिनिधी-उपजिल्हा रुग्णालय, देगलूर येथे शनिवारी आयोजित करण्यात आलेल्या विशेष मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिरात सात रुग्णांवर यशस्वी शस्त्रक्रिया करण्यात आल्या. जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. पेरके यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच वैद्यकीय अधीक्षक डॉ. नरेश देवणीकर यांच्या नेतृत्वाखाली हे शिबिर पार पडले.

शिबिरात उपजिल्हा रुग्णालयातील नेत्र शल्यचिकित्सक डॉ. नाईक आणि डॉ. लखमावार यांनी रुग्णांवर यशस्वीरीत्या मोतीबिंदू शस्त्रक्रिया केल्या. भुलतज्ज्ञ म्हणून डॉ. अनिल थडके यांनी महत्त्वपूर्ण जबाबदारी पार पाडली.या शस्त्रक्रिया शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी ओटी इन्चार्ज मोमीन सिस्टर, शिवाजी पवार (ब्रदर), नेत्राधिकारी कसबे, ओटी असिस्टंट जमील यांच्यासह उपजिल्हा रुग्णालयातील सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले. उपजिल्हा रुग्णालयात अशा प्रकारच्या डोळ्यांच्या शस्त्रक्रिया शिबिरांचे आयोजन दर महिन्याच्या प्रत्येक शनिवारी करण्यात येणार असल्याची माहिती रुग्णालय प्रशासनाने दिली. तसेच कुटुंब कल्याण स्त्री शस्त्रक्रिया, सिझेरियन, अपेंडिक्स, हर्निया, हायड्रोसील तसेच शरीरावरील विविध गाठींच्या शस्त्रक्रिया दर मंगळवारी नियमितपणे करण्यात येत आहेत. गरजू रुग्णांनी या सुविधांचा लाभ घेण्यासाठी उपजिल्हा रुग्णालय, देगलूर येथे संपर्क साधावा, असे आवाहन वैद्यकीय अधीक्षक डॉ. नरेश देवणीकर यांनी केले आहे.

# २३ वर्षे संघर्ष,दहा वर्षे भाड्याच्या इमारतीत कारभार

## स्वतःचीच मालमत्ता सुरक्षित नाही;अखेर भूमी अभिलेख विभागाची इमारत झाली नामशेष

किनवट/प्रतिनिधी-ज्या उद्देशाने भूमी अभिलेख कार्यालयाच्या इमारत उभारणीवर निधी खर्ची लावला तो अखेर इमारत भूईसपाट झाल्यामुळे तुर्तास तरी असफल झाल्याचे चित्र दिसते. अवघ्या चार वर्षांत इमारतीला भेगा पडल्या आणि पावसाच्या पाण्यामुळे इमारतीला गळती लागल्याने भूमी अभिलेख कार्यालय चक्क दहा वर्ष भाड्याच्या इमारतीत स्थलांतरित करण्यात आले. भूमी अभिलेख विभागाच्या मालकीची मालमत्ता सुरक्षित आणि ताब्यात ठेवण्यात स्थानिक प्रशासन सद्यस्थितीत अपयशी ठरले असे म्हणने संयुक्तिक होईल.

स्थानिक भूमी अभिलेख विभागाची इमारत भूईसपाट झाल्या प्रकरणी सायं दैनिक नांदेड वार्तानं १३ जून रोजी वृत्त प्रकाशित केले होते. शे.स.नं.२२७ मधील ५ गुंठे जमीन ही भूमी अभिलेख विभागाच्या मालकीची असतानासुद्धा त्याकडे प्रशासनाने कधी गांभीर्याने घेतलेले दिसत नाही. शेतकऱ्यांच्या



जमिनी अधिग्रहण करून मावेजा दिल्यानंतर तेवढ्यापुरत्या हस्तांतरित केल्या जातात परंतु मूळ सातबारा नक्कलेतून कमी का केल्या जात नाहीत ? नेमके याच ठिकाणी पाणी मुरते. स्थानिक भूमी अभिलेख विभागाचे उपाधीक्षक महेंद्र गंबरे यांच्या पुर्वीच्या अधिकाऱ्यांनी अक्षम्य दुर्लक्ष केल्यामुळे इमारत भूईसपाट झाल्याची चर्चा ऐकायला मिळते. सन १९९९ ला बांधकाम पूर्ण होऊन हस्तांतरित झाल्यानंतर २०१२ पर्यंत गळक्या इमारतीतच हे भूमी अभिलेख कार्यालय कार्यान्वित होते. उपविभागातील दस्त व कागदी रेकॉर्ड गळक्या इमारतीच्या पाण्यामुळे खराब होईल म्हणून सन २०१२ ते २०२२ पर्यंत भाड्याच्या इमारतीत कार्यालय होते. त्यानंतर मात्र २०२२ पासून तहसील कार्यालयाच्या प्रशासकीय इमारतीत सुरू केले. आता मात्र चक्क कार्यालय भूईसपाट झाल्याचे पहावयास मिळते. भूमी अभिलेख कार्यालयाच्या इमारत भूईसपाट प्रकरणी उपाधीक्षक महेंद्र गंबरे यांनी प्रकरणाची गंभीर दखल घेतली आहे. सदरील ५ गुंठे मालमत्ता त्यांचीच असल्याचे त्यांनी सांगितले. कागदपत्रांची जुळवाजुळव करण्यासाठी धडपड चालू होती. इमारत भूईसपाट प्रकरणाची आता कुठे कारवाई प्रक्रियेच्या दिशेने वाटचाल सुरू होऊ लागली आहे. बहूचर्चीत प्रकरण पुढे काय काय वळण घेणार? याकडे तमाम लोकांचे लक्ष लागून आहे.

# दुसऱ्यांची मुलं चोरण्यापेक्षा स्वत:चे कार्यकर्ते मोठे करा

## शर्मिला ठाकरेंचा भाजप-आरएसएसवर घणाघात

मुंबई/प्रतिनिधी-दुसऱ्यांचे पक्ष फोडण्यापेक्षा स्वत:चे कार्यकर्ते घडवा, असा सल्लाच देत त्यांनी भाजपच्या पक्षफोडीच्या राजकारणावर महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे प्रमुख राज ठाकरे यांच्या पत्नी शर्मिला ठाकरे यांनी आरएसएस व भाजपवर घणाघाती टीका केली आहे.

मनसे प्रमुख राज ठाकरे यांच्या वाढदिवसानिमित्त चेंबूर येथे आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात त्या प्रसारमाध्यमांशी बोलत होत्या. यावेळी त्यांनी शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस आणि तृणमूल काँग्रेसमधील झालेल्या फुटींचा उल्लेख करत भाजपवर टीकेची झोड उठवली. उद्धव ठाकरे यांनी रविवारी घेतलेल्या खासदारांच्या बैठकीसंदर्भात बोलताना शर्मिला ठाकरे म्हणाल्या, एखाद्या बैठकीला पाच-सहा जण अनुपस्थित राहिले म्हणजे ते पक्ष सोडून गेले, असा निष्कर्ष काढण्याचे कारण नाही. मला स्वत:ला याचा अनुभव आहे. काही लोक पक्ष सोडणार असल्याची शंका आली की मी त्यांना फोन करायचे. तेव्हा ते 'आम्ही तुमच्यासोबतच आहोत' असे सांगायचे, पण दुसऱ्याच क्षणी ते दुसऱ्या पक्षात प्रवेश करताना टीव्हीवर दिसायचे.



विष्णुपुरी येथील पीएमश्री जिल्हा परिषद हायस्कूल येथे शाळा प्रवेश उत्सव कार्यक्रमात विद्यार्थ्यांचे जि.प.च्या सीईओ मेघना कावली यांनी पुष्पगुच्छ, गणवेश व पाठ्यपुस्तक देवून त्यांचे स्वागत केले. यावेळी डॉ.सुधीर देशमुख, शिक्षणाधिकारी वंदना फुटाणे, डॉ.सुर्यवंशी, गटशिक्षणाधिकारी सुधीर गुट्टे, बाळासाहेब कच्छवे, सुभाष खाकरे व इतर उपस्थित होते.

# स्वीट मार्टमधील खव्याच्या मिष्टान्नांवर एफडीए कधी लक्ष देणार?

धर्माबाद/प्रतिनिधी-धर्माबाद तालुक्यात दूध, मिठाई तसेच दैनंदिन वापरातील विविध अन्नपदार्थांच्या गुणवत्तेबाबत नागरिकांमध्ये गंभीर चिंता व्यक्त केली जात आहे. राज्य अन्न व औषध प्रशासन विभागाचे आयुक्त म्हणून आयएएस अधिकारी तुकाराम मुंढे यांनी पदभार स्वीकारल्यानंतर राज्यभरात भेसळयुक्त व बनावट अन्नपदार्थांविरोधात कारवाईचा धडाका सुरू केला असला, तरी धर्माबाद तालुक्यातील काही संवेदनशील बाबींवर अद्याप अपेक्षित प्रमाणात लक्ष दिले जात नसल्याची भावना नागरिकांमधून व्यक्त होत आहे.

तालुक्यात एफडीएच्या अधिकाऱ्यांकडून किरकोळ स्वरूपाच्या कारवाया करण्यात येत असल्या, तरी स्वीट मार्टमध्ये विक्रीसाठी ठेवण्यात येणाऱ्या खव्यापासून बनविलेल्या मिष्टान्नांची गुणवत्ता, दूध डेअऱ्यांमधील दूध व दुग्धजन्य पदार्थ तसेच गुटख्याच्या विक्रीबाबत व्यापक तपासणी व धडक कारवाईची गरज असल्याचे मत नागरिकांनी व्यक्त केले आहे.धर्माबाद शहरासह ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणात स्वीट मार्टची दुकाने कार्यरत असून, सण-उत्सवांच्या काळात मिठाईला मोठी मागणी असते. अशा परिस्थितीत बाजारात विक्रीसाठी उपलब्ध असलेल्या अन्नपदार्थांवर नियमित व काटेकोर नियंत्रण आवश्यक असल्याचे स्थानिक नागरिकांचे म्हणणे आहे. केवळ औपचारिक तपासणीवर समाधान न मानता संबंधित विभागाने प्रत्यक्ष ठिकाणी जाऊन नमुने संकलित करणे, गुणवत्ता चाचण्या करणे, अचानक छापेमारी करणे आणि भेसळयुक्त पदार्थांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी जोर धरत आहे. विशेषतः डेअरी उत्पादने, मिठाई विक्री केंद्रे आणि दैनंदिन वापरातील खाद्यपदार्थांवर अधिक बारकाईने लक्ष ठेवण्याची आवश्यकता व्यक्त केली जात आहे. अचानक तपासणी पथकांची संख्या वाढविणे, नियमित देखरेख ठेवणे आणि नागरिकांच्या आरोग्याशी संबंधित बाबींमध्ये कोणतीही तडजोड न करता कठोर उपाययोजना राबविण्याची अपेक्षा धर्माबादकरांकडून व्यक्त होत आहे.

# 'सीजेपी'चे नेते अभिजीत दीपके यांना मारहाण

मुंबई/प्रतिनिधी-नीट पेपरफुटीविरोधात आंदोलन छेडून संपूर्ण देशभरातील युवकांच्या गळ्यातील ताईत बनलेले कॉकरोच जनता पार्टीचे नेते अभिजीत दीपके यांना मारहाण झाल्याची घटना घडली आहे. जयपूर येथे आंदोलन सुरू असताना काही युवकांनी अभिजीत दीपके यांच्या जवळ जाऊन त्यांच्या कानशिलात लगावली. यानंतर कॉकरोच जनता पार्टीचे कार्यकर्ते चांगलेच आक्रमक झाले होते. दीपके यांना मारहाण करणाऱ्या अज्ञातांविरोधात आंदोलनस्थळी मोठा रोष पाहायला मिळाला. दिपके यांनी नवी दिल्लीत जंतरमंतरवर आंदोलन केल्यानंतर पुण्यात विद्यापीठात मोठे आंदोलन केले. त्यानंतर देशभरातील अनेक ठिकाणीआंदोलन करणार असल्याची घोषणा दिपके यांनी केली. त्यानुसार आज जयपूर येथे आंदोलन सुरू होते. जयपूरमध्ये आंदोलन सुरू असताना एका अज्ञाताने दिपके यांच्या दिशेने जाऊन,गर्दीत घुसून त्यांच्यावर हात उचलला अन् गर्दीचा फायदा घेऊन तिथून निसटला.दीपके यांना मारल्याचे लक्षात आल्यानंतर त्यांचे कार्यकर्ते आक्रमक झाले होते.मात्र त्यांना मारू नका,सोडून द्या,असा इशारा दीपके यांनी त्यांच्या कार्यकर्त्यांना केला.

# भोकरमधील बोगस खत विक्रीचा मास्टरमाईंड पोलिसांच्या जाळ्यात:ईतर दोन आरोपीही झाले निष्पन्न

भोकर/प्रतिनिधी-तालुक्यात अनेक दिवसापासून बोगस खताची विक्री करणारा मास्टरमाईंड फरार आरोपी ४ दिवसानंतर सापडला. न्यायालयाने पोलीस कोठडी दिल्याने कसून चौकशी करण्यात आली ईतर २ आरोपी सुद्धा निष्पन्न झाले असून त्यामधील एका आरोपीला अटक करण्यात आली एक आरोपी मात्र अद्यापही फरारच आहे.

भोकर तालुक्यातील बल्लाळ तांडा येथे ७ जून रोजी रात्री १० वाजताच्या दरम्यान वाहन क्रमांक एम.एच. २६ बी. ई.९४०२ मध्ये भाग्यलक्ष्मी ग्रो बायोटेक मुदखेड रोड भोकर या कथित एजन्सीचा मालक बालाजी मानिका करंडेकर याने ६० पोते बोगस खताचे भरून पावती देऊन विक्री करीत असताना शेतकऱ्यांनीच बोगस खत असल्याचे कृषी विभागाला कळविले पोलीसही घटनास्थळी रवाना झाले ७ लाख ८ हजाराचा ऐवज जप्त करण्यात आला, त्यानंतर आरोपी विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. चार दिवस सदर आरोपी फरारच होता १२ जून रोजी सदर आरोपीला अटक करून न्यायालयासमोर उभे केले असता दोन दिवसाची पोलीस कोठडी मिळाली. त्यानंतर तपासामध्ये ईतर आरोपींची नावे निष्पन्न झाली त्यापैकी संतोष दत्ता उटलवाड रा. पांडुरना ता. भोकर यास अटक करण्यात आली. सुभाष रामेश्वर सोनी रा. भोकर हा आरोपी फरार असून पोलीस त्याचा शोध घेत आहेत'. भोकर तालुक्यात काही वर्षापासून बालाजी करंडेकर हा बोगस खताचा व्यवसाय करतो. त्यामुळे शेतकऱ्यांची व शासनाची मोठ्या प्रमाणावर फसवणूक झाली आहे. कृषी विभागाने मात्र जाणीवपूर्वक या प्रकाराकडे दुर्लक्ष केले सदर आरोपी बोगस खत विक्रीचा धंदा करीत असताना कृषी विभागाला थांब पत्ता लागला नाही कसा? किती दिवसापासून भोकर मध्ये हा धंदा चालू आहे? असे माहित असताना सुद्धा त्याचा परवाना रद्द का केला नाही? कृषी विभागाचे संगणमत होते की, काय अशी चर्चा आता पुढे येऊ लागली असून कृषी विभागाच्या कारभारावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. या प्रकरणातील आरोपी अटक करण्यासाठी जिल्हा पोलीस अधीक्षक अबीनाश कुमार, अप्पर पोलीस अधीक्षक अर्चना पाटील, सुरज गुरव, उपविभागीय अधिकारी दगडू हाके यांच्या मार्गदर्शनानुसार स.पो.नी. शैलेंद्र औटे यांनी तपासाची चक्रे गतिमान केली. मुख्य आरोपी मिळाल्यानंतर आरोपीचा शोध घेतला. त्यानंतर इतर दोन आरोपींना शोधण्यासाठी चक्रे गतिमान केली संतोष दत्ता उटलवाड यास अटक करण्यात आली, सुभाष रामेश्वर सोनी हा आरोपी सध्या फरार आहे. पीएसआय दिलीप जाधव, पोहेका विष्णू खिल्लारे, पो.का खलील शेख, परमेश्वर गाडेकर यांनी तपास कामी सहकार्य केले. पुढील तपास पीएसआय जाधव हे करीत आहेत. कृषी विभागाचे काम असताना पोलिसांनी या प्रकरणात विशेष लक्ष केंद्रित करून आरोपींना ताब्यात घेतले. आता या प्रकरणी मोठे रॅकेट उघडकीस येण्याची शक्यता आहे कृषी विभागाच्या अधिकाऱ्यांना सुद्धा जबाबदार धरून वरिष्ठ अधिकाऱ्यांनी या प्रकरणात विशेष लक्ष देण्याची गरज आहे.

# शिरपूर जि.प.शाळेत तात्काळ शिक्षकांची नियुक्ती करावी

## अन्यथा शाळेला कुलूप ठोकण्याचा ग्रामस्थांचा इशारा

मांडवी/प्रतिनिधी-आजपासून नवीन शैक्षणिक वर्षाला सुरुवात झाली असून ठिकठिकाणी मुलांचे उत्साहात स्वागत केले जात आहे. मात्र, तालुक्यातील शिरपूर येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत पहिल्याच दिवशी वेगळेच चित्र पाहायला मिळत आहे. या शाळेत पहिली ते पाचवीपर्यंतचे वर्ग असून एकूण ५० विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. परंतु, एवढ्या मोठ्या संख्येसाठी आणि पाच वर्गांसाठी शाळेत फक्त एकच शिक्षक कार्यरत असल्याने विद्यार्थ्यांचे प्रचंड शैक्षणिक नुकसान होत आहे.

शाळेच्या पहिल्याच दिवशी प्रशासनाचा हा सावळा गोंधळ समोर आल्याने पालकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे. एकाच शिक्षकाने पाच वर्ग कसे सांभाळावे आणि मुलांना दर्जेदार शिक्षण कसे द्यावे, असा संतप्त सवाल आता उपस्थित केला जात आहे. या अपुऱ्या शिक्षक संख्येमुळे आमच्या मुलांचे भविष्य अंधारात चालल्याची भीती पालकांनी व्यक्त केली आहे. या गंभीर समस्येची दखल घेत गावकऱ्यांनी आता आक्रमक पाऊल उचलले आहे. येत्या ४ ते ५ दिवसांत शिक्षण विभागाने शिरपूर शाळेत आवश्यक शिक्षकांची पदे न भरल्यास, शाळेला कुलूप ठोकण्याचा (ताळेबंद करण्याचा) थेट इशारा देण्यात आला आहे. पाच वर्गांना शिकवायला फक्त एकच शिक्षक असणे हा विद्यार्थ्यांवर अन्याय आहे. शिक्षण विभागाने पुढील ४ ते ५ दिवसांत येथे नवीन शिक्षकांची नियुक्ती करावी, अन्यथा आम्ही शाळेला कुलूप ठोकू असा इशारा ग्रामस्थांनी दिला आहे. या आंदोलनाच्या इशाऱ्याला शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष, सर्व सदस्य तसेच समस्त ग्रामस्थ आणि पालकांनी पूर्ण पाठिंबा दिला आहे. आता यावर शिक्षण विभाग वेळेत जागे होऊन विद्यार्थ्यांचे नुकसान टाळणार की गावकऱ्यांना आंदोलनाचे हत्यार उपसावे लागणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# वीजेच्या लंपडावाला नागरिक वैतागले

नांदेड/प्रतिनिधी-गेल्या काही दिवसांपासून शहरातील अनेक भागात कमी-जास्त दाबाने विद्युत पुरवठा सुरु असून यातील तांत्रिक अडचणी दुर करण्यास अद्याप वीज वितरण कंपनीला यश आल्याचे दिसून येत नाही. दिवसरात्र वीजेचा लंपडाव सुरु असल्याने या प्रकाराला नागरिक जाम वैतागले आहेत. सध्या पावसाळ्याचे दिवस असले तरी तापमानाचा पारा वाढलेलाच आहे. मृग नक्षत्रानंतर पावसाने दांडी मारली. त्यातच वारंवार वीज खंडीत होत असल्यामुळे नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे.

पान १ वरुन

## जून अर्धा संपला तरीही...

हा मोठा प्रश्न आहे. पाण्याची टंचाई विहिरी आणि कूपनलिकांच्या पाण्याच्या पातळीत मोठी घट झाली आहे. दुबार पेरणी करावी लागल्यास बियाणे आणि मजुरीचा खर्च दुप्पट होणार आहे. ज्या शेतकऱ्यांनी अद्याप पेरणी केलेली नाही, ते आता मोठ्या पावसाची चातकासारखी वाट पाहत आहेत.सध्या मांडवी परिसरातील आकाशात ढग जमा होतात, पण पाऊस पडत नसल्याने शेतकऱ्यांची निराशा होत आहे. आता संपूर्ण पट्ट्याला एका दमदार आणि दिलासादायक पावसाची अत्यंत गरज आहे, अन्यथा चालु खरीप हंगाम धोक्यात येण्याची दाट शक्यता निर्माण झाली आहे.

## शिवसेनेचे पाच खासदार...

नाराज असल्याचे सांगितले जाणारे पाचही खासदार ग्रामीण महाराष्ट्रातील असून, आणखी एक खासदार उत्तर मुंबईतील असल्याची चर्चा आहे. या पार्श्वभूमीवर काही खासदार स्वतंत्र गट स्थापन करण्याच्या तयारीत असल्याची माहिती समोर येत आहे. यासंदर्भात लोकसभा अध्यक्षांकडे पत्र देण्याचीही तयारी सुरू असल्याचे सूत्रांचे म्हणणे आहे. दरम्यान, ठाकरे गटातील काही खासदारांनी दिल्लीमध्ये शिवसेना (शिंदे गट)चे केंद्रीय राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांची भेट घेतल्याची माहिती समोर आली आहे.

## संभाजीनगरचा न्याय नांदेडलाही...

कारणावरून उमेदवारी बाद होऊ शकते, तर नांदेडमध्येही समान निकष लावले जाणे आवश्यक आहे. अन्यथा निवडणूक प्रक्रियेच्या पारदर्शकतेवर प्रश्नचिन्ह निर्माण होईल, असे जाधव यांनी म्हटले आहे. जिल्हा बँकेच्या निवडणुकीची प्रक्रिया सुरुवातीपासूनच वादाच्या भोवऱ्यात अडकलेली आहे. विविध आक्षेप, तक्रारी आणि न्यायालयीन याचिकांमुळे निवडणुकीवर अनिश्चिततेचे सावट निर्माण झाले आहे. आता निवडणूक प्रशासन या आरोपांची कायदेशीर पडताळणी करून समान न्यायाचा सिद्धांत लागू करते की राजकीय दबावाखाली प्रकरणाकडे दुर्लक्ष करते, याकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

# प्रा.अंजली मालकर यांचे शास्त्रीय संगीताविषयी सप्रयोग व्याख्यान

नांदेड/प्रतिनिधी-नरहर कुरुंदकर प्रगत अध्ययन व संशोधन केन्द्राच्या वतीने दि.१७ जून रोजी पुणे येथील सुप्रसिध्द गायिका आणि संगीततज्ज्ञ प्रा.अंजली मालकर यांचे सायन्स कॉलेजच्या पूरणमल लाहोटी सभागृहात सायं. ६ वा. 'रागसंगीताचे आस्वादन' या विषयावर सप्रयोग व्याख्यान होणार आहे.या कार्यक्रमात डॉ.जगदीश देशमुख (तबला),श्री.मिहीर जोशी (हार्मोनियम) व श्री.पंकज शिरभाते (व्हायोलीन) हे कलावंत त्यांना साथ देतील.

ग्वाल्हेर-जयपूर घराण्याच्या चतुरस्त्र गायिका म्हणून प्रा.अंजली मालकर सुपरिचित आहेत.पारदर्शी मधुर आवाज आणि दीर्घ साधनेतून मिळालेली वैचारिक बैठक हे त्यांच्या गायनाचे वैशिष्ट्य आहे.प्रा.अंजली मालकर यांचे प्राथमिक शिक्षण त्यांच्या आई श्रीमती तारा बसोले व श्री.मधुसूदन भावे यांच्याकडे झाले.श्री.यशवंत क्षीरसागर, पं. सी. आर. व्यास,डॉ. वीणा सहस्त्रबुध्दे, पं. विकास कशाळकर यांचेही मार्गदर्शन त्यांना लाभले.सध्या त्या विदुषी कुमुदिनी काटदरे व पं.मिलिंद मालशे यांच्याकडे गायनाचे शिक्षण घेत आहेत.त्यांच्या सांगीतिक वाटचालीत भारत सरकारच्या दोन वर्षांच्या शिष्यवृत्तीबरोबरच नामवंत संगीत स्पर्धांमध्ये मिळालेल्या पुरस्कारांचा समावेश आहे.त्यांना काशी संगीत समाजाने २०११ साली 'संगीत रत्न' पुरस्काराने सन्मानित केले आहे तसेच २०१६ साली गानवर्धन संस्था,पुणे यांनी 'स्वर साधना पुरस्कार' त्यांना प्रदान केला आहे.शास्त्रीय गायनाच्या मैफिलींबरोबरच हे गायन सर्वसामान्य श्रोत्यांपर्यन्त पोहचावे म्हणून संपूर्ण देशात त्यांनी सप्रयोग व्याख्याने दिली आहेत.रागसंगीताविषयीचे चिंतन त्या ब्लॉग रूपाने लिहितात.त्यांचे 'मराठवाड्यातील अभिजात संगीत' व 'हिन्दुस्तानी अभिजात संगीताचा इतिहास'(दोन खंड) हे ग्रंथ प्रकाशित झाले आहेत.भारती विद्यापीठाच्या संगीत विभागात मानद गुरू म्हणून त्या कार्यरत आहेत.रूपबंदिश फौंडेशनच्या त्या संचालिका आहेत.सायन्स कॉलेजच्या पूरणमल लाहोटी सभागृहात सायं.या कार्यक्रमाचा रसिकांनी लाभ घ्यावा असे आवाहन संयोजकांनी केले आहे.

हे वृत्तपत्र प्रकाशक, मालक व संपादक प्रदिप अनंतराव नागापूरकर यांनी मुद्रक अब्दुल गफुर अब्दुल रझाक यांच्या सिमा प्रिंटींग ॲण्ड लिथो प्रिंटींग प्रेस इतवारा बाजार नांदेड, ता.जि.नांदेड येथे छापून नागापूरकर हाऊस, हाऊस नं.१-१०-६९३, विनायकनगर, नवा मोंढा, ता.जि.नांदेड-२ येथे प्रकाशीत केले.आर. एन. आय. नं. ४७१३५/८८ E-mail: nandedwarta@mail.com, मो.९४२२१७४७७४